**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भोला एच. तांबोळी
सचिव, महाराष्ट्र प्रदेश
आखिल भारतीय सफाई मजदूर (वर्ग) पुणे
१५, क्वीन्स गार्डन, क्यू ६८, पुरंदर, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सिनिअर लिगल ॲसिस्टंट,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ज्युनिअर लिगल ॲसिस्टंट,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७७/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भोला एच. तांबोळी
सचिव, महाराष्ट्र प्रदेश अखिल भारतीय सफाई मजदूर (वर्ग) पुणे
१५, क्वीन्स गार्डन, क्यू ६८, पुरंदर, पुणे-१

**जन माहिती अधिकारी** तथा ज्युनिअर लिगल ॲसिस्टंट, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड. मंजुषा इधाटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>शासन परिपत्रकातील तरतुदींची / आदेशांची सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने द्यावयाच्या नेमणुकीबाबत अंमलबजावणी, स्पष्टीकरण / अभिप्रायाची मागणी | |

## विवेचन

सफाई कर्मचा-यांच्या वारसांना सेवेत सामावून घेण्याबाबतच्या शासकीय परिपत्रकांच्या

संदर्भात २१ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. भोला एच. तांबोळी, सचिव, महाराष्ट्र प्रदेश, अखिल भारतीय सफाई मजदूर (वर्ग) पुणे यांनी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ विधी सल्लागार, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. शासकीय परिपत्रकातील तरतुदींचा अन्वयार्थ व भाष्य यांची मागणी केली असल्यामुळे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही, या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा ज्युनिअर विधी सल्लागार, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी माहिती नाकारली.

दि. २७.५.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याच स्वरुपाचे, परंतु स्पष्टीकरणात्मक मुद्देनिहाय उत्तर दिले. महानगरपालिकेकडील अधिकारी शासन निर्णयाचे व परिपत्रकाचे विपरीत अर्थ काढून सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्रास देतात. असा विपरीत अर्थ न काढता नेमका अन्वयार्थ स्पष्ट होऊन वारसा हक्काच्या नियुक्त्या व्हाव्यात, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री. तांबोळी यांनी केले.

शासकीय परिपत्रकांचा अन्वयार्थ व त्यावरील भाष्य यांची मागणी 'माहिती' म्हणून श्री. तांबोळी यांनी केली आहे. ते आपण देऊ शकत नाही व तसे त्यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले. ते रास्त आहे.

अपीलकर्त्याची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.उत्तम आनंदराव पाटील
मु.पो.ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १५.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उप संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
श्री. दिनकर महादेव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
श्री. पांडुरंग गणपती साठे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २८-०७-२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ०१-०९-२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २५-०९-०९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

जिजामाता बालक मंदिर, आष्टा या संस्थेसंदर्भात उप संचालक कोल्हापूर, प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून संस्थेची बनावट कागदपत्रे, सह्या तयार करुन अध्यक्ष, सचिव यांच्या खोट्या सह्या केल्याबाबत प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत व त्या अनुषंगाने २ ते १२ मुद्दयांची माहिती

## विवेचन

आयोगाने दि. १४.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमा त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १५.९.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. ऊत्तम आनंदराव पाटील यांनी मागितलेली माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाशी संबंधित नाही. ही माहिती त्यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे मागणे आवश्यक असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट करूनही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. पी. जी. साठे व अपिलीय प्राधिकारी श्री. एस.के.जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह आयोगापुढील सुनावणीत केले.

माहिती शिक्षण उप संचालक कार्यालयातच असून ती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली आहे, असे श्री. पाटील यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. मात्र उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता तसे दिसून येत नाही. श्री. पाटील यांचा अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य त्या संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग करणे अधिक योग्य ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रविंद्र सदाशिवराव यादव
वार्ताहर समाजसत्ता,
रा.स.नं.१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड,
येरवडा, पुणे-४११ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे
महानगरपालिका (पथ विभाग), पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे
महानगरपालिका (पथ विभाग), पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. रविंद्र सदाशिवराव यादव
वार्ताहर समाजसत्ता,
रा.स.नं.१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे-४११ ००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त,
ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका
(पथ विभाग), पुणे श्री. ज्ञानेश्वर मोळक

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,<br>संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका<br>(पथ विभाग), पुणे श्री. मुकुंद भोसले | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे आळंदी रस्ता ते प्रतिकनगर चौक रस्त्याचे खोदाई करणाऱ्या इसमाबाबत कार्यवाही संदर्भात माहिती | |

## विवेचन

बेकायदेशीरपणे रस्ता खोदाई करण्याच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. रविंद्र सदाशिवराव यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२०५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

बेकायदेशीरपणे रस्ता खोदाई करणा-या व्यक्तींविरुध्द कारवाई केली जात नाही व माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार श्री. यादव यांनी केली. मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती दिली आहे. अधिक माहिती हवी असल्यास देण्याची तयारी आहे. त्याबाबत कळवूनही अपीलकर्ता माहिती घेण्यास येत नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री. मुकुंद भोसले यांनी केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. संबंधित कागदपत्रांच्या प्रती श्री. यादव यांना पाठविल्याची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला सादर करावी. तसेच रस्ता खोदाईच्या अनुषंगाने पोलीसांकडे केलेल्या तक्रारीची सांक्षाकित प्रत

अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार रजिस्टर टपालाने अपीलकर्त्यास कागदपत्रांच्या प्रती पाठविण्यात आल्याचे संबंधित पत्रांच्या प्रतीसह जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.३१.८.२००९ रोजी आयोगाला अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नितीन मदन नगरकर
अनुज अपार्टमेंट, फ्लॅट नं.१,
स्टेट बँक कॉलनी, निर्झर सोसायटी,
स्वप्नशिल्प सोसायटीसमोर, कोथरूड,
पुणे - ४११ ०३८

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (कर),
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नितीन मदन नगरकर
अनुज अपार्टमेंट, फ्लॅट नं.१, स्टेट बँक कॉलनी, निर्झर सोसायटी,
स्वप्नशिल्प सोसायटीसमोर, कोथरूड, पुणे - ४११ ०३८

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व
कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. दयानंद एस.सोनकांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.१.२००९ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>श्री. उज्वल गोविंद केसकर यांच्या १२८९, शिवाजीनगर या मिळकतीसंबंधी अभय योजना करविषयक सहभागी होण्यासाठी अर्ज केला होता का ? केला असल्यास कधी व अर्ज आला असल्यास त्यावर महानगरपालिकेने काय कारवाई केली, याची माहिती |
|---|---|

## विवेचन

श्री. उज्वल गोविंद केसकर हे मिळकतीबाबतच्या करामध्ये महानगरपालिकेची लाखो रूपयांची फसवणूक करीत आहेत, अशी तक्रार करून त्यांच्यावर कारवाईची मागणी करणारे अर्ज आपण दि.१३.६.२००८ व दि. ९.७.२००८ रोजी महानगरपालिका आयुक्तांना दिले होते. त्यावरील कार्यवाहीची माहिती आपण माहितीच्या अधिकारात मागितली. परंतु संगनमताने ती दडपून भ्रष्टाचार केला व दडविला जात आहे म्हणून ही माहिती मिळावी व महानगरपालिकेचे लाखो रूपयांचे आर्थिक नुकसान करण्यास कारणीभूत असणारे व त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी आपण करीत आहोत, परंतु त्याची दखल घेतली जात नाही, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री. नितिन मदन नगरकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. उज्वल गोविंद केसकर हे १२८९, शिवाजीनगर ह्या मिळकतीचे मालक आहेत. मिळकत कराबाबत गेल्या वीस वर्षांपासून ते महानगरपालिकेची फसवणूक करीत आहेत. परंतु ते नगरसेवक व राजकीय नेते असल्यामुळे पुरावा देऊनसुध्दा त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही, असे प्रतिपादन श्री. नगरकर यांनी लेखी व तोंडी केले.

श्री. नगरकर यांनी याबाबत केलेल्या अर्जांवर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात आली आहे व त्यांना त्या त्या वेळी वेळी उत्तर देण्यात आले आहे. त्यांनी मागितलेली माहिती व कागदपत्रे देण्यात आली असून आर्थिक फसवणुकीच्या आरोपावरून फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याबाबत विधीसल्लागारांचा अभिप्राय मागविण्यात आला आहे. तो मिळाल्यानंतर त्याचा तपशील देता येईल, असे श्री. नगरकर यांना त्या त्या वेळी कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. दयानंद एस. सोनकांबळे व अपिलीय प्राधिकारी श्री. विलास कानडे यांनी केले. श्री. नगरकर यांना दिलेली उत्तरे व त्यांच्या माहिती-मागणीच्या अनुषंगाने पूरक कागदपत्रे यांच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

श्री. केसकर यांनी मिळकत कराबाबत महानगरपालिकेची फसवणूक गेल्या वीस वर्षांपासून चालविली आहे. महानगरपालिकेची मिळकतकरविषयक अभय योजना लागू होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक होते. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी ती केलेली नाही, असे प्रतिपादन श्री. नगरकर यांनी अर्ज, अपील व अन्य निवेदने यामध्ये वारंवार केले आहे. मात्र त्यांच्या अर्जातील अनेक मुद्दे भाष्य करणारे व 'होय किंवा नाही अशी उत्तरे द्या' अशी मागणी करणारे आहेत. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती 'ठरत' नाही.

श्री. नगरकर यांच्या दृष्टीने त्यांनी दिलेल्या पुराव्यानुसार श्री. केसकर यांच्याविरूध्द कारवाई होणे अपेक्षित आहे. परंतु हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० .०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कादर शेख
रा. चाळ क्र. ४५/३५१, लक्ष्मीनिवास, पर्वती,
पुणे-४११ ००९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
भवन रचना, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
भवन रचना, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१०३ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. कादर शेख
रा. चाळ क्र.. ४५/३५१, लक्ष्मीनिवास, पर्वती, पुणे-४११ ००९

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
भवन रचना, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ना.न. बारापात्रे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
भवन रचना, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. दिलीप पावरा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.५.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत छायांकित प्रत जोडली आहे. |

## विवेचन

सह्याद्री सेवा प्रतिष्ठान, पुणे येथील व्यायाम शाळेला महानगरपालिकेने सील लावण्याच्या अनुषंगाने माहिती व संबंधित कागदपत्रांच्या प्रती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. कादर शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१५.७.२००९ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

सन १९८८ पासून या जागेत व्यायामशाळा आहे. अतिक्रमीत जागेवर नियमानुसार निधी वापरता येत नसताना महानगरपालिकेने खर्च केला. त्याबाबतची नियमावली दिली जात नाही. तसेच व्यायाम शाळेला सील करताना पंचनामा केलेला नाही. त्याबाबतची माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. शेख यांनी केले.

श्री. शेख यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. व्यायामशाळा पोलिसांच्या समक्ष सील करण्यात आली असून महानगरपालिकेला तसे अधिकार आहेत. पंचनामा करण्यात आलेला नाही, हेही श्री. शेख यांना कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. दिलीप पावरा यांनी नमूद केले. व्यायामशाळा पूर्वी पत्र्याच्या शेडमध्ये होती. त्यानंतर विकास योजना (डी.पी.डी.सी.), अर्थसंकल्पीय तरतूद यामधून महानगरपालिकेने वास्तू बांधली व तेथील अतिक्रमण काढण्याची कारवाई केली. सन २००० ते २००५ पर्यंत हे काम झाले. व्यायामशाळा अनधिकृतपणे चालू असल्याची तक्रार नगरसेवक श्री. अनिल जाधव यांनी केल्यानंतर महानगरपालिका आयुक्तांच्या तोंडी आदेशानुसार दि. २९.१.२००८ रोजी पोलिसांसमक्ष व्यायामशाळेला सील केले. सह्याद्री प्रतिष्ठानने महानगरपालिका न्यायालयात व दिवाणी न्यायालयात महानगरपालिकेविरुध्द केलेल्या दाव्यांमध्ये महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लागला आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयाने प्रतिष्ठानचे अपील फेटाळले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री. ना. न. बारापात्रे यांनी केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. पूरक माहिती म्हणून संबंधित नियमावलीच्या मान्यतापत्राची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा स्पष्टीकरणामत्क तपशील व नियमावलीस मान्यता पत्राची प्रत दि.२८.८.२००९ रोजी श्री. शेख यांना देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २९ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. महादेव ज्योती उमराणे
मुक्ता सैनिक सोसायटी, शंकरनगर जवळ,जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपसचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७-११-२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०-१२-२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६-१२-२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५-२-२००८ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये जन माहिती अधिकाऱ्यां-कडून वसूल करण्यात येणाऱ्या शास्तीची रक्कम शासनाकडेच ठेवावी, अशी तरतूद सदर कायद्यात आहे काय, याबाबतचा खुलासा आणि असद्‌भावनेने माहिती देण्याचे नाकारल्यास अथवा जाणून बुजून चुकीची, अपुरी व दिशभूल करणारी माहिती दिल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियमच्या कलम २० अन्वये शासकीय माहिती अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्याची शिफारस करण्याची तरतूद आहे, त्याअनुषंगाने खुलासा. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री. महादेव ज्योती उमराणे यांनी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २० संदर्भातील तरतूदींबाबत खुलासेवजा स्वरुपात माहिती मागितली होती.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्ता श्री. उमराणे यांच्या अर्जावर जन माहिती अधिकार यांनी दिलेले उत्तर, प्रथम अपील अर्ज व त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा अधिनियम सार्वजनिक दस्तऐवज असून त्यामधील तरतूदी स्वयंस्पष्ट आहेत. स्पष्टीकरण, खुलासा यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. एन. एस. पाटील
ताराई पार्क, चिंतामन नगर, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२८/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २९.८.२००८ |

**३ उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली डॉ. एस. आर. बामणे

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली श्री. टी. ए. तेली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.३.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. २१.९.१९८६ ते २०.९.२००६ या कालावधीतील कर्मचा-यांची संख्या व कलम ४ नुसार तयार केलेली माहिती, व कालावधीत सेवाज्येष्ठता यादी केव्हा तयार केली त्याची तारीख व छायांकित प्रत, त्यांना शिपाई ते परिचारक म्हणून केव्हा पदोन्नती मिळाली ती तारीख व त्या आदेशाची प्रत, वेतन निश्चिती करताना संबंधित कार्यालयाला पाठविलेल्या प्रस्तावाची फाईल,

| | |
|---|---|
| | दि. १८.११.२००५ रोजी कोर्टाने दिलेल्या आदेशावर केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, कोर्ट आदेशानुसार प्रयोगशाळा परिचारक मधील दिवाळी व उन्हाळी सुट्या किती शिल्लक आहेत, त्याची छायांकित प्रत, सन १९८५ ते ३०.४.२००५ मधील धुलाई भत्ता याची छायांकित प्रत |

## विवेचन

न्यायालयाच्या निकालानंतर केलेल्या आपल्या वेतननिश्चिती संदर्भातील दि.१६.९.१९८५ ते दि.२०.१२.२००६ या काळातील माहिती आपल्याला विहित मुदतीत न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. एन.एस.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २९.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीला अपीलकर्ता गैरहजर होते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तसेच सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास दाखविण्यात आली आहेत, असे दिसते. अपीलकर्त्याचा मूळ प्रश्न शिपाई व प्रयोगशाळा परिचारक यांच्या पगारातील फरकाची रक्कम व वेतननिश्चिती याबाबतच्या कार्यवाहीचा आहे. त्याची पूर्तता पूर्वी झाली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली डॉ.एस.आर.बामणे यांनी नमूद केले. या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार प्राचार्य डॉ.बामणे यांनी दि. १७.९.२००८ च्या पत्रान्वये सर्व कागदपत्रांच्या प्रतीसह अहवाल आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २३.९.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बळीराम बाबुराव कोकरे
माऊली निवास, नवीन एस.टी.कॉलनी,
साठेनगर जवळ, सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली, ता.मिरज,जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा उप उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली, ता.मिरज,जि.सांगली

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २९.८.२००८ |

**५ उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली, ता.मिरज,जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री. बी.जी.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उप उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली, ता.मिरज,जि.सांगली डॉ. सदाशिव निवृत्ती जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.४.२००७ |
| ८ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>एस.टी.कामगार घरबांधणी सहकारी संस्था मर्या., सांगली ही संस्था नोंदणीकृत असून संस्थेचे बायलॉज, जुन्या संचालक मंडळांची नावे व पत्ते, संस्थेवर प्रशासक का नेमला याची कारणे, संस्थेच्या एकूण पूर्वीच्या व आजच्या सभासदांची नावे व पत्ते, चालू संचालक मंडळाची नावे व पत्ते, संस्थेने आजपर्यंत केलेले लेखापरीक्षण, जुन्या व नव्या संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व | |

| | |
|---|---|
| | मिटींगचे प्रोसीडिंग, संस्थेने सभासद व बिगर सभासदांवर केलेले सहकारी न्यायालयातील व दिवाणी न्यायालयातील आजपर्यंत केलेले सर्व दावे व त्याची कारणे, व सभासदांना पाठविलेल्या नोटिसा व इ. माहिती |

## विवेचन

एस.टी.कामगार घरबांधणी सहकारी संस्था मर्यादित, सांगली या संस्थेबाबतची माहिती, संस्था पातळीवरील असल्यामुळे संस्थेकडून घेण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्ता श्री. बळीराम बाबूराव कोकरे यांना कळविले व संस्थेला तशा सूचना दिल्या. परंतु श्री. कोकरे हे संस्थेचे सभासद नाहीत, व संस्थेला शासकीय अर्थसहाय्य वा सवलती मिळत नसून, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही, असे कळवून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,सहकारी संस्था, मिरज यांनी संस्थेकडून माहिती मागवून घेऊन अपीलकर्त्यास द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी दिले. त्यानुसार संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन श्री. कोकरे यांना दि.२८.१२.२००७ रोजी विनामूल्य माहिती देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक,सहकारी संस्था, मिरज डॉ. सदाशिव निवृत्ती जाधव यांनी केले. वस्तुत: जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्याच वेळी आयोगास हे अवगत करणे आवश्यक होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर — अपीलकर्ता
द्वारा साप्ताहिक यशोधरा,
महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ मार्केट,
मिरज- ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह,
मिरज एज्युकेशन सोसायटी,
ज्युबिली इंग्रजी कन्याशाळा, मिरज,जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
ज्युबिली इंग्रजी कन्याशाळा, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४७/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २९.८.२००८ |

४ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर
द्वारा साप्ताहिक यशोधरा, महानगरपालिका कार्यालयासमोर,
तांदूळ मार्केट, मिरज- ४१६ ४१०

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह, मिरज एज्युकेशन सोसायटी,
ज्युबिली इंग्रजी कन्याशाळा, मिरज,जि.सांगली श्री. शंकर रामकृष्ण मराठे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, ज्युबिली इंग्रजी कन्याशाळा,
मिरज, जि. सांगली सौ. आशा अंजनकुमार कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

मिरज एज्युकेशन सोसायटीच्या संदर्भातील अठरा मुद्दयांची माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, मिरज एज्युकेशन सोसायटी, मिरज यांनी अपिलाची दखल घेतली नाही. नंतर दिलेली माहितीही अपुरी आहे. किती उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या? मुलाखत घेणाऱ्या तज्ञांची शैक्षणित पात्रता काय? हे नेमकेपणाने कळविले नाही. ज्या संस्थेला अद्याप शासकीय अथवा आवश्यक खात्याची मान्यता मिळालेली नाही, किंवा त्यासाठी अर्जही केलेला नाही, तिने जाहिरात देऊन प्राध्यापक पदासाठी मुलाखती घेऊन उमेदवारांची घोर फसवणूक केलेली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर यांनी केले.

श्री. खाडीलकर यांनी मागितलेली सर्व माहिती दिली आहे. कोणताही तपशील राहिला असल्यास दिला जाईल. पात्र व्यक्तींनाच नेमणुका दिल्या आहेत व त्यात कोणाचीही फसवणूक केलेली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, मिरज एज्युकेशन सोसायटी, मिरज यांचेकडे केलेल्या अपिलाची मुदत संपण्या आधीच श्री. खाडीलकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. व्यक्तीशः त्यांची संस्थेचे सभासद होण्याची इच्छा असून अन्य दोन व्यक्तींना सभासद करुन घेण्याबाबत ते आग्रही आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, मिरज एज्युकेशन सोसायटी, मिरज यांनी केले.

अपीलकर्त्यास नेमकी माहिती देणे आवश्यक आहे. त्याबाबत दक्षता घेण्याची समज जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना आयोगाने सुनावणीच्या वेळी दिली. अपीलकर्ता व संस्था यांच्यामधील मतभेद हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले — अपीलकर्ता
सिध्दिविनायक प्रसाद,
डॉ. शामा प्रसाद मुखर्जी रोड, डोंबिवली (पुर्व)
ता. कल्याण, जि. ठाणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५८/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

४ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली
तर्फे प्रतिनिधी श्री. एस. आर. रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००७ |

| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.६.२००७ |
|---|---|---|

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका परिक्षेत्रात एकूण अधिकृत बांधकामे किती व एकूण अनधिकृत बांधकामे किती याची प्रभाग निहाय विगतवारी याबाबत माहिती

## विवेचन

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील अधिकृत व अनधिकृत बांधकामांची संख्या आपण मागितली होती. परंतु नगर रचना विभाग, घरपट्टी विभाग यांनी महानगरपालिकेकडे अशी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. ठाणे महानगरपालिकेकडून अशी माहिती मिळू शकते, पण सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेत ती असू शकत नाही, मग नगर रचना विभागाची आवश्यकता काय? बांधकामाची तपासणी न करता घरपट्टी लावण्यात येते काय? अशी विचारणा अपीलकर्ता श्री. कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

महानगरपालिकेत अशा प्रकारची संकलीत माहिती ठेवली जात नाही, मात्र ती ठेवली गेली पाहिजे, हे अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांनी मान्य केले व पाहणी करुन अशी माहिती अपीलकर्त्यास कळविली जाईल, असे त्यांनी सांगितले. त्यानुसार दि.५.९.२००८ रोजी श्री. गोखले यांना माहिती पाठविण्यात आल्याचे संबंधित प्रतीसह अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.८.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र नारायण जाधव — अपीलकर्ता
१०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर,
सांगली, ता. मिरज, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २९.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जि. सांगली श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली
तर्फे प्रतिनिधी श्री. एस. आर. रसाळे

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

सोबत प्रत जोडली आहे.

## विवेचन

कत्रांटी कामगारांच्या संदर्भात कोणतीही माहिती आधी दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर अपुरी माहिती दिली. काही बाबतीत कारणे दिली नाहीत, इ. बाबी नमूद करून अपीलकर्ता श्री. रामचंद्र नारायण जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती मागणारे आठ अर्ज आपण केले होते. त्याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार श्री. जाधव यांनी दि.७.१०.२००७ रोजी आयोगाकडे केली होती. या अनुषंगाने आयोगाने अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन दि.१.११.२००७ च्या पत्रान्वये मागविले होते. या पत्रानंतर आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधला. आपल्या अर्जाप्रमाणे व्यक्तीशः माहिती नेण्याची वाट पाहून अधिकाऱ्यांनी आपल्या घराशेजारी राहणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्याकडे माहिती दिली असल्याचे स्थळप्रतीवरील त्यांच्या स्वाक्षरीसह निदर्शनास आणले. या माहितीने आपण पूर्ण समाधानी असून काही तक्रार नाही, असे श्री. जाधव यांनी आयोगापुढील सुनावणीच्या संदर्भात दि.२६.८.२००८ रोजीच्या (प्राप्त दि. २७.८.२००८) निवेदनाद्वारे आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गणपत धनवडे
अध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी मंच, शाखा सातारा,
मु.पो.नुने, ता. व जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती वाई, ता.वाई, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खानापूर,
ता.वाई , जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५९ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.८.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणपत धनवडे
अध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी मंच, शाखा सातारा, मु.पो.नुने, ता. व जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.विजय मारुती पवार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खानापूर,
ता.वाई , जि.सातारा श्री.विठ्ठल किसन संकपाळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.येसू महादू जाधव, मु.पो.खानापूर यांचा खानापूर ग्रामपंचायत मिळकत क्र.२३६/६५९ जुना नमुना नं.८अ चे व फेरफार उतारे सन १९५९ ते २००० पर्यंतचे. | |

## विवेचन

श्री.येसू महादू जाधव, मु.पो.खानापूर यांची खानापूर येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.२३६/६५९ चे सन १९५९ ते २००० पर्यंतचे जुना नमुना नं.८अ चे व फेरफार उतारे अपीलकर्ता श्री.गणपत धनवडे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खानापूर यांच्याकडे मागितले होते. हे उतारे आपल्याला न मिळाल्याच्या कारणावरुन व आपल्या मागणीनुसार ग्रामपंचायतीच्या बैठकीत ठराव घेऊन नोंद करण्याचे आश्वासन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई यांच्यापुढील सुनावणीत देऊनही त्यानुसार कार्यवाही झाली नाही, म्हणून श्री.धनवडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण शुल्क भरुनही आपल्याला हवी ती माहिती दिली नाही, चुकीची माहिती दिली, असे प्रतिपादन श्री.धनवडे यांनी केले. श्री.धनवडे यांना विहित मुदतीत शुल्काबाबत कळवून शुल्क भरल्यानंतर सर्व माहिती दिली आहे. मूळ नोंदीनुसार सर्व उताऱ्यांच्या प्रती त्यांना दिल्या, असे जन माहिती अधिकारी श्री.विठ्ठल किसन संकपाळ यांनी मूळ रजिस्टरसह आयोगापुढे सादर केले. ज्या व्यक्तीच्या नावे उतारे मागितले ते दिले आहेत. दर चार वर्षांनी कर आकारणी होते, त्यानंतर घर-क्रमांक बदलतात त्यामुळे दिलेली माहिती योग्य असल्याचे अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एम.पवार यांनी सांगितले.

श्री.येसू महादू जाधव यांच्या नावाच्या ग्रामपंचायत मिळकतीचे उतारे श्री.धनवडे यांना दिले, परंतु त्यांचे समाधान झाले नाही. श्री.येसू महादू जाधव यांचा वारस मुलगा एकनाथ यशवंत जाधव याचे मिळकत क्र.२३६ च्या घराचा तपशील व लगतच्या मोकळ्या जागेची नोंद करुन तसा उतारा देण्याची मागणी श्री.धनवडे यांनी केली. त्याबाबतचा स्वतंत्र अर्ज केल्यानंतर त्याबाबतची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी यांच्यापुढील सुनावणीच्या वेळी ठरले, असे नमूद करुन गटविकास अधिकारी श्री.विजय मारुती पवार यांनी याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती वाई यांनी केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीचा तपशील लेखी व तोंडी सादर केला. तो पाहता अपीलकर्त्याने मूळ अर्जात व अपिलात माहितीपेक्षा प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केली असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्यालाही प्रतिसाद दिला आहे, असे दिसते. ते स्वागतार्ह असले तरी अशा प्रकारची मागणी व कार्यवाही हा महितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर विष्णू टोणगावकर
सी-७, काकडे टाऊनशिप, केशवनगर,
चिंचवड, पुणे-४११०३३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व संचालक,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय तथा
परिमंडळीय अधिकारी, पुणे परिमंडळ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मृद सर्वेक्षण अधिकारी,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६१ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७. ५ .२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर विष्णू टोणगावकर
सी-७, काकडे टाऊनशिप, केशवनगर, चिंचवड, पुणे-४११०३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय तथा परिमंडळीय अधिकारी, पुणे परिमंडळ श्री.क.म.शाह

**जन माहिती अधिकारी** तथा मृद सर्वेक्षण अधिकारी,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे-१ श्री.सुभाषचंद्र राजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१.शासनाच्या पूर्व अनुमतीने किंवा झोनल कार्यालयाशी संलग्न असलेल्या मंडळ कार्यालय प्रमुखांच्या शिफारशीनुसार झोनल स्तरावरुन एप्रिल १९८३ ते एप्रिल २००६ अखेरपर्यंत किती तृतीयवर्ग कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक देण्यात आला, त्यासंबंधीचे निकष, त्यासाठी लागणारा अनुभव इ. २.शासन निर्णयानुसार किती तृतीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या जिल्ह्याबाहेर करण्यात आल्या, पैकी किती बदल्या राजकीय, कार्यरत अधिकारी, निवृत्त अधिकारी, वैद्यकीय दबावाखाली करण्यात आल्या. शासनाला याबाबत अहवाल सादर करण्यात आला आहे काय, सदरचा शासन निर्णय अस्तित्वात आहे का, नसल्यास तो रद्द झाल्याच्या आदेशाची प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मधुकर विष्णू टोणगावकर यांनी एप्रिल १९८३ ते एप्रिल २००६ या काळातील पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांच्या पुणे परिमंडळाकडे मानीव दिनांकांच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. 'आपण मागविलेली माहिती अवास्तव असल्यामुळे व कार्यालयीन कामाचा भार वाढवित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(क) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही,' असे मृद्सर्वेक्षण अधिकारी, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे श्री.प्र.बा.कांबळे यांनी श्री.टोणगावकर यांना कळविले. त्याविरुध्द श्री.टोणगावकर यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे परिमंडळ श्री.क.म.शाह यांनी, श्री.टोणगावकर उपस्थित न राहिल्याने, निकाली काढले. त्याविरुध्द श्री.टोणगावकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अशाच स्वरुपाची माहिती आपण ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे व मुंबई परिमंडळीय अधिकारी, सिंचन भवन, ठाणे यांच्याकडे मागितली होती. त्यांनी ती दिली. पण पुणे परिमंडळ मात्र ही माहिती देण्यास तयार नाही, असे श्री.टोणगावकर यांनी अपील अर्जात म्हटले आहे.

त्या संदर्भात आयोगाने केलेल्या विचारणेवर विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुभाषचंद्र राजे यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात माहितीची मागणी विस्तृत असल्याचे नमूद केले आहे. श्री.टोणगावकर यांनी २४ वर्षांची माहिती मागितली असून २४ वर्षांतील अभिलेखावरुन ती तयार करावी लागेल, त्यामुळे विलंब लागेल, असे त्यांना कळविले होते. तसेच आपले कार्यालय परिमंडळ म्हणून जुलै १९९६ पासून कार्यान्वित असून श्री.टोणगावकर यांनी एप्रिल १९८३ पासूनची माहिती मागितली आहे. श्री.टोणगावकर यांनी कार्यालयात येऊन अभिलेखाची समक्ष पाहणी करुन आवश्यक माहितीची मागणी करावी, असे त्यांना कळविले होते. परंतु त्यास त्यांनी नकार दिला, असे श्री.राजे यांनी दि.२७.५.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व लेखी निवेदनात नमूद केले.

याच प्रकारची माहिती विनातक्रार व चर्चेसाठी न बोलावता ठाणे परिमंडळ कार्यालयाकडून निर्धारित वेळेत प्राप्त झाली असल्याने पुणे परिमंडळाकडून संपूर्ण सत्याधारित माहिती व तीही मोफतच मिळाली पाहिजे, असे श्री.टोणगावकर यांनी प्रपत्रात व लेखी निवेदनाद्वारे सादर केले असून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावण्याची मागणी केली आहे.

श्री.टोणगावकर याच कार्यालयात भांडारपाल होते. विविध पातळ्यांवर ते या संदर्भातील माहिती मागत आले आहेत, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. उपरोक्त कार्यालयात भ्रष्टाचार, वशिलेबाजी, शासनाचा महसूल बुडविणारी कार्यपध्दती असल्याचे सरसकट आरोप त्यांनी विविध लेखी निवेदनांमध्ये केले आहेत. अनेक वृत्तपत्रांमधील देशभरातील विविध प्रकरणाच्या संदर्भातील कात्रणे त्यंनी सादर केली असून अनेक विषयांवरील भाष्य व प्रदर्शन केले आहे. माहितीच्या अधिकारातील माहितीच्या मागणीशी त्याचा दुरान्वयाने संबंध जोडून अवाजवी पत्रव्यवहार त्यानी केला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेली माहिती किंवा अभिलेख

अवलोकनासाठी केलेले पाचारण याबाबतीतही त्यांनी विस्तृत स्वरुपाचे भाष्य केले आहे. त्यांची ही कृती योग्य नाही. वस्तुतः त्यांना २४ वर्षातील अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती घेता आली असती. माहितीचे संकलन करणे आवश्यक असून दिड महिन्यांच्या कालावधीत ती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी श्री.सुभाषचंद्र राजे व अपिलीय प्राधिकारी श्री.क.म.शाह यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते. त्यानुसार १२९ पृष्ठांची ऊर्वरित माहिती त्यांना निःशुल्क देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी श्री.सुभाषचंद्र राजे यांनी दि.२६.६.२००८ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले.

अपीलकर्त्याची विस्तृत माहितीची मागणी, जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेला पत्रव्यवहार व अपीलकर्त्याने सादर केलेली निवेदने यांचा विचार करता अपीलकर्त्याची शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती देण्यास किमान दिड महिन्याचा कालावधी आवश्यक आहे, असे दि.१५.१२.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद करणारे जन माहिती अधिकारीच दि.२७.५.२००७ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रांतही दिड महिन्याचा कालावधी लागेल, असे नमूद करतात, हे माहिती देण्याबाबत तत्परता असल्याचे निदर्शक नाही. याबाबत आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अधिक तत्परतेने व अधिक गांभीर्याने कार्यवाही करण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ९ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. समीर प्रकाश पाटील — अपीलकर्ता
५९, यादोगोपाळ पेठ, शेजारी अपार्टमेंट,
४, विंग बी, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
श्री. रमेश चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
श्री. एन. एल. कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली बिनशेती आदेशाची माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी, कार्यालय सातारा यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. समीर प्रकाश पाटील यांनी केली. 'माहिती' या व्याख्येत बसणारी उपलब्ध माहिती डॉ. पाटील यांना देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांनी दिले. डॉ. पाटील यांच्या एका गट क्रमांकाच्या संदर्भात बिनशेती परवानगी दिलेली असल्याचे आढळून येत नसल्याचे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. अन्य गट क्रमांकाच्या संदर्भातील बिनशेती आदेशाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. ऊर्वरित पोटहिश्श्याची बिनशेती झालेली नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. एन. एल. कुंभारे यांनी केले.

डॉ. पाटील यांनी मूळ अर्जात बिनशेती आदेशाची तारीख, क्रमांक आदी तपशील दिलेला नव्हता. तरीही संदर्भ शोधून व विविध कार्यालयांशी संपर्क साधून माहिती देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री. रमेश चव्हाण यांनी नमूद केले.

उपरोक्त बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २३.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. एस.बी. अवसरे
८२०, पोस्ट ऑफीस नजीक,
तासगाव, सांगली- ४१६ ३१२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (ग्रा.वि.)
महाराष्ट राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता (ग्रा.वि.)
महाराष्ट राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. एस.बी. अवसरे
८२०, पोस्ट ऑफीस नजीक, तासगाव, सांगली- ४१६ ३१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (ग्रा.वि.)
महाराष्ट राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली श्री. डी.के.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता (ग्रा.वि.)
महाराष्ट राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली श्री. विश्वास राम कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

सोबत प्रत जोडली आहे.

## विवेचन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून आपल्याला मिळावयाच्या बिलासंबंधी आपण मागितलेली माहिती वेळेत मिळाली नाही, तसेच उपदानाची रक्कम १ महिना १७ दिवस उशिरा मिळाली. विलंब कालावधीचा विचार होऊन उपदान मिळावे, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री. एस.बी. अवसरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला माहिती मिळाली. परंतु त्यातून आपल्याला अर्थबोध होत नाही. तसेच आपल्याला ज्या मुदतीत देयके आदा करणे आवश्यक होते त्या मुदतीत न दिल्यामुळे दिलेली माहिती चुकीची ठरते. निवृत्तीनंतर ३० दिवसात उपदानाची रक्कम मिळावी, असा विद्युत वितरण कंपनीचा नियम आहे. त्यामुळे आपली बिले कोणाकडे व किती दिवस प्रलंबित होती याची माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन श्री. अवसरे यांनी केले.

श्री. अवसरे यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. द्यावयाच्या रकमेचा धनादेश नेण्याबाबत त्यांना कळविले होते, परंतु ते आले नाहीत. त्यांना पाठविलेले परत आलेले पाकीट प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिका-यांसमोर फोडून धनादेश देण्यात आला. रजा - मुदत प्रवासबिलाचा धनादेश त्यांनी नाकारला, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

देयकाबाबत झालेल्या विलंबाच्या कारणाबाबतची वस्तुस्थिती व कार्यवाहीचा तपशील अपीलकर्त्यास चार दिवसांत द्यावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (ग्रा.वि.) महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली यांनी दि. ४.९.२००८ च्या पत्रान्वये संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह आयोगाला सादर केला. परंतु आपल्याला विविध रकमा देण्यास नियमापेक्षा विलंब केला आहे. काही बिले अद्याप मंजूर केली नाहीत, अशी तक्रार श्री. अवसरे यांनी

दि.१८.९.२००८ च्या पत्रान्वये केली असून नुकसानभरपाईची मागणी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे स्वतंत्र पत्राद्वारे केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. मात्र आयोगाने अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ग्रा.वि.) महाराष्ट्र राज्य विदयूत वितरण कं. लि. सांगली यांना कार्यवाहीबाबत विचारणा केली. त्यावर श्री. अवसरे यांच्या मूळ अर्जानुसार संपूर्ण माहिती व सर्व देयके वेळोवेळी मंजूर करुन अदा केली आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. डी. के. पाटील यांनी दि.७.१०.२००८ च्या पत्राने श्री. अवसरे यांना कळवून आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. २५.९.२००९